वाचा :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील मंजुर टिपणी दिनांक- 13/04/2018

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-/168 /2018
नाशिक दिनांक :- 13/04/2018

**आदेश**

शासनाच्या महत्वपूर्ण धोरणांतर्गत ग्रामीण विकासासाठी केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची अमंलबजावणी करण्यात येत आहे. त्यासअनुसरुन नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत शासनाच्या विविध योजना यांच्या दर्जात्मक व गुणात्मक अमंलबजावणीसाठी नाशिक जिल्हा परिष्ददेच्या अधिनस्त अधिकारी यांची तालुका सनियंत्रण व तालुका संपर्क अधिकारी म्हणून याद्वारे नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन विकास योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी होऊन ध्वजाकिंत योजना बाबत प्रभावी सनियत्रंण होईल.

त्यानुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 अन्वये कलम 95 (1) (ख) च्या प्रदान अधिकारनुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक याद्वारे जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत कार्यरत वर्ग-1 अधिकारी यांची तालुका सनियत्रंण व तालुका संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

**सनियंत्रण अधिकारी**

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | सनियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | श्री.अनिल लांडगे | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी | नाशिक,इगतपुरी, त्रंबकेश्वर , दिंडोरी,पेठ, सुरगाणा, कळवण,देवळा, |
| 2 | श्री.प्रमोद पवार | प्रकल्प संचालक ,जि.ग्रा.वि.यंत्रणा | बागलाण,चांदवड, मालेगांव, नांदगांव, येवला , निफाड, सिन्नर |

वरील प्रमाणे सनियत्रण अधिकारी यांनी सोपविलेल्या तालुक्याच्या संपर्क अधिकारी यांचेशी समन्वय ठेऊन व प्रत्यक्षात तालुक्यांना नियोजन करुन भेटी देऊन तालुका व योजना निहाय प्रगती बाबत आढावा घ्यावा. तालुकास्तरीय योजना व अंमलबजावणी बाबत येणा-या अडीअडचणी बाबत निराकरण करावे. सोपविण्यात आलेल्या तालुक्यातील महत्वाच्या ध्वजाकिंत व इतर योजना याबाबत प्रभावी सनियत्रंण ठेवावे. याबाबत तालुकानिहाय मुल्यांकन संपर्क अधिकारी यांचे मार्फत मागवून योजनानिहाय कमी साध्य पूर्ती तालुक्यातील संबंधित यंत्रणाची सुनावणी घेण्यात यावी. यानुसार कार्यप्रणाली अनुसरावी व तालुक्यांचा प्रगती अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना अवगत करुन दिशा निर्देशनाबाबत चर्चा करावी.

**तालुका संपर्क अधिकारी**

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | तालुका संपर्क अधिकारी यांना सोपविलेले तालुके |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 |
| 1 | श्री.प्रदिप चौधरी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | निफाड |
| 2 | श्री.राजेंद्र पाटील | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रांप) | नाशिक |
| 3 | श्रीमती.प्रतिभा संगमनेरे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) | दिंडोरी |
| 4 | श्री.डी.बी.मुंडे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) | सुरगाणा |
| 5 | श्री.बोधीकिरण सोनकांबळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | त्रंबकेश्वर |
| 6 | श्री.बापूसाहेब पोपटराव साळुंखे | कार्यकारी अभियंता इवद क्र.1 | सिन्नर |

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | तालुका संपर्क अधिकारी यांना सोपविलेले तालुके |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 |
| 7 | श्री.संजय नारखेडे | कार्यकारी अभियंता इवद क्र.2 | बागलाण |
| 8 | श्री.बापू देसले | कार्यकारी अभियंता ल.पा (पूर्व) | मालेगांव |
| 9 | श्री.चंद्रकांत वाघमारे | कार्यकारी अभियंता ल.पा.(पश्चिम) | देवळा |
| 10 | श्री.प्रकाश नंदनवरे | कार्यकारी अभियंता ,ग्रा.पा.पुरवठा | कळवण |
| 11 | श्री.हेमंत काळे | कृषी विकास अधिकारी | नांदगांव |
| 12 | डॉ.श्री.सुशिल वाघचौरे | जिल्हा आरोग्य अधिकारी | पेठ |
| 13 | डॉ.श्री.विष्णूपंत गर्जे | जिल्हा पुशसंवर्धन अधिकारी | चांदवड |
| 14 | श्रीमती.वैशाली झनकर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | इगतपुरी |
| 15 | श्री.नितीन बच्छाव | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | येवला |

वरील प्रमाणे तालुका संपर्क अधिकारी यांनी दरआठवडयात सोमवार वगळून नेमून दिलेल्या तालुक्यांस नियमित भेट दयावी व तालुकास्तरावरील अधिका-यांचा योजना निहाय आढावा घ्यावा. तालुक्यांचा योजनानिहाय मुल्यांकन अहवाल तालुकासनियंत्रण अधिकारी व मला समक्ष वेळोवेळी होणा-या शासनस्तरावरील योजना,कार्यक्रम बाबत उदिष्ट पूर्तीकरीता आवश्यक बैठका व कार्यवाही संपर्क अधिकारी म्हणून आपण वेळोवेळी करावी व दरसोमवारी आढावा सादर करावा.

तालुका संपर्क अधिकारी यांनी खालील महत्वाच्य ध्वजाकिंत योजनांबाबत भौतिक व आर्थिक प्रगती बाबत प्रत्यक्षात भेटी व आढावा सादर करावा.

1. प्रधानमंत्री आवास योजना अपूर्ण घरकुले सन-2016-17, 2017-18 व नविन उदिष्टयाप्रमाणे 2018-19
2. इंदिरा आवास योजना अपूर्ण घरकुले सन-2010 ते 2015-16
3. शबरी घरकुल योजना अपूर्ण घरकुले
4. रमाई आवास योजना अपूर्ण घरकुले
5. मग्रारोहयो अंतर्गत अपूर्ण सिंचन विहीरी
6. मग्रारोहयो अंतर्गत सर्व अपूर्ण कामे
7. जलयुक्त शिवार योजना अंतर्गतकामे
8. कुपोषण निर्मूलन संदर्भात होत असलेले कामकाज
9. प्राथमिक शाळा/अंगणवाडी/प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र/पशुसंवर्धन दवाखाने/ग्रामपंचायत यांना भेटी देऊन तेथील कामकाजाबाबत पडताळणी
10. मागासवर्गीयावरील खर्च 20%, महिला बाल कल्याणावरील 10% खर्च, अपंगावरील खर्च 3% योजना अनुजाती व नवबौध्द वस्ती सुधार योजना व इतर महत्वाच्या योजना, झिरो पेडन्सी बाबत आढावा.
11. मानव निर्देशांक, उपजिवीका संसाधने वृध्दी साठी तालुक्यांत विविध उपक्रम राबविणे बाबत आढावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

प्रति,

1. खाते प्रमुख (तालुका संपर्क अधिकारी सर्व)
   जिल्हा परिषद,नाशिक

**प्रत कार्यवाहसाठी**

**1.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक**
**2.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,नाशिक.**
**3.गट विकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती (सर्व)**